# चौथी परीक्षा प्रश्नपत्रिका २०२२

उमेदवाराचे नाव ______________________ वय ________

परीक्षा केंद्र ________________________________

परीक्षा संचालकाचे नाव ______________________ सही ________

तारीख ________________________

लेखी परीक्षा गुणदान

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | एकूण गुण | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | कविता व अर्थ | छोटी/ इतर माहिती | सामान्य ज्ञान माहिती | श्रवण प्रश्नोत्तरे | वाचन प्रश्नोत्तरे | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | १० | ५ | १० | १५ | १५ | ६० |

एकूण अंतिम गुण /१००

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.
© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न क्र. १ अ) खालील माहिती वाचा आणि प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा. गुण ६**

उन्हाळयात अमित लिंबू सरबत बनवून पॉकेट मनी मिळवतो. त्यासाठी लागणारे सामान तो आईबरोबर जाऊन दुकानातून आणतो. त्याच्या शेजारचे लोक लिंबू सरबत प्यायला गर्दी करतात.

सरबतासाठी लागणारे सामान:

१. पाणी- १००० mL (मिलीलिटर)

२. लिंबाचा रस- २००mL(मिलीलिटर)

३. साखर- २७५ g (ग्रॅम)

४. मीठ- २५ g (ग्रॅम)

एकूण सरबत- १५००mL

एक ग्लास सरबत - १०० mL,  एक ग्लास सरबताची किंमत - २ डॉलर

प्रश्न १. लिंबाचा रस आणि पाणी मिळून किती मिलीलिटर (mL) होतात?

प्रश्न २. साखर आणि मीठ मिळून किती ग्रॅम (g) होतात ?

प्रश्न ३. अमितने सातशे ग्लास सरबत विकले तर किती डॉलर मिळतील?

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.

© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न ४. वर दिलेली रेसिपी तिप्पट केली तर एकूण किती मिलीलिटर (mL) सरबत तयार होईल?

प्रश्न ५. वर दिलेली रेसिपी दहापट केली तर किती ग्रॅम (g) साखर लागेल?

प्रश्न ६. अमितने एकूण दहा हजार मिलीलिटर (mL) सरबत केले तर त्यामध्ये किती ग्लास विकता येतील?

**प्रश्न १ ब) खाली दिलेले चारही अंक वापरून ४-अंकी संख्या बनवा.**

गुण ४

तुम्ही बनवलेली ४-अंकी संख्या खालील रकान्यामधे अंकात आणि शब्दात लिहा.

(३, ९, ५, ६ )

| संख्या | अंकात | शब्दात |
|---|---|---|
| १. | ___ ___ ___ ___ | ______________ |
| २. | ___ ___ ___ ___ | ______________ |

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.

© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न २अ) खालील वाक्ये वाचून कंसातील योग्य उत्तराभोवती गोल ( ) करा.**
**गुण ५**

१. मोठ्या शहरांमध्ये वाहतुकीचे अनेक प्रकार असतात त्यामुळे प्रवासाची __________ वाढते.
( काळजी, सहजता, आनंद )

२. खगोलशास्त्रज्ञांनी सूर्यमाला, ग्रह, तारे यांच्या अभ्यासात बरीच __________ केली आहे.
( प्रगती, पंचाईत, आदळआपट )

३. समर्थ रामदास कोणाचे भक्त होते? __________
( शिवाजी महाराज, राम , सज्जनगड )

४. पृथ्वीवरचे तापमान वाढल्यामुळे जलचक्रावर __________ होतो आहे असे लोक म्हणतात. ( बोलणे, परिणाम, अधूनमधून )

५. सूर्यमालेतील ग्रह सूर्याभोवती __________ . ( धावतात, फिरतात, चालतात )

**प्रश्न २ ब) खालील वाक्ये वाचून बरोबर ✔ किंवा चूक ✖ अशी खूण करा. गुण ५**

१. मकर संक्रांतीला सूर्यग्रहण असते म्हणूनच लोक काळे कपडे घालतात.____

२.शास्त्रज्ञ इतर ग्रहांवर जीव शोधण्यास उत्सुक आहेत.____

३.रस्त्यावर गाड्यांची तुफान गर्दी पाहून लोक कंटाळतात .____

४. समर्थ रामदास घर सोडून पळून गेले. ____

५.सावरकरांना खात्री होती की ब्रिटिशांशी मैत्री वाढवून भारताला लवकर स्वातंत्र्य मिळेल.____

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.

© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ३अ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. गुण२.५**

| | |
|---|---|
| ज्ञान X | सुख X |
| मित्र X | अवघड X |
| शिस्त X | |

**प्रश्न ३ब) खाली दिलेला प्रत्येक शब्द फक्त एकदा वापरून ५-जोडशब्द बनवा.**

**गुण२.५**

(कोरा , सुलट , **आपट**, बुक्की ,केर , थाट , धक्का, माट , उलट, नवा, कचरा, **आदळ** )

| | |
|---|---|
| उदाहरण - **आदळआपट** | ३. |
| १. | ४. |
| २. | ५. |

**प्रश्न ३क) योग्य उद्गारवाचक शब्द वापरून गाळलेल्या जागा भरा.**

( छे, अरेच्या, बापरे, अरेरे, वा वा ) **गुण२.५**

| | |
|---|---|
| १)________! तुम्ही लवकर आलात! | ४) ________ ! अगदी थोडक्यात बक्षीस चुकलं तुझं. |
| २) ________! आम्ही नाही विसरलो! | ५) ________! किती गोड चव आहे कोकणच्या आंब्याची! |
| ३) ________! आता काय करायचं? | |

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.

© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ३ड) खालील क्रियापदांचा काळ ओळखा आणि योग्य रकान्यात  अशी खूण करा.**

**गुण२.५**

| क्रियापद | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| उदाहरण- पळाला | |  | |
| १. विसरली | | | |
| २. करतोस | | | |
| ३. भेटेन | | | |
| ४. हवे असेल | | | |
| ५. गायला | | | |
| ६. आहे | | | |
| ७. चिडलो | | | |
| ८. बोललात | | | |
| ९. आठवेल | | | |
| १०. हरवशील | | | |

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.

© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ४अ) खालील संवाद वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा. गुण ६**

**बाबा-** ठरलं तर! आपण या प्रवासात आग्रा शहराला भेट द्यायची.

**आई-** मुलांनो, आयुष्यात एकदातरी आग्र्याला जायचं, हे माझं लहानपणापासूनचं स्वप्न होतं.

**सीमा-** अरे वा! तिथे तर सुप्रसिद्ध ताजमहाल आहे.

**बाबा-** तर बेत असा आहे की, आधी दिल्लीला मिनू मावशीकडे जायचं मग तिथून आग्रा. तीपण आपल्याबरोबर येणार आहे.

**आई-** ताजमहालसारखे आपले हॉटेलही यमुनेकाठी आहे!

**राम-** आम्ही काल जगातील सात आश्चर्यांबद्दल शिकलो. त्यात ग्रेट वॉल ऑफ चायना, इजिप्तचे पिरॅमिड, पेरूचे माचू पिचू ही ठिकाणे देखील होती. ताजमहालबद्दल ऐकून तर मी थक्कच झालो.

**आई-** आग्र्याला शिवाजी महाराजांना नजरकैदेत ठेवलं होतं. मिठाईच्या पेटाऱ्यातून त्यांनी मोठ्या चतुराईने स्वतःची आणि संभाजीराजेंची कशी सुटका करून घेतली- ही गोष्ट आठवतेय का तुम्हांला?

**बाबा-** अरे हो! मिठाईवरून आठवलं, आग्र्याची खास मिठाई पेठा बरं का.

१.ताजमहाल बघायला कोणकोण जाणार होते? १ गुण

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.

© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

२. ताजमहाल जवळची नदी कोणती? १ गुण

३. ताजमहाल सोडून जगातील इतर दोन आश्चर्ये कोणती? १ गुण

४. शिवाजी महाराजांचा आग्र्याशी काय संबंध होता? २ गुण

५.आग्र्याची खास मिठाई कोणती आहे ? १ गुण

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.

© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ४ब) खालील वाक्ये पूर्ण करा.** **गुण ४**

१.शाळेला सुट्टी मिळाली कारण ______________________________

______________________________________________

२.जेव्हा माझा वाढदिवस असतो तेव्हा ______________________________

______________________________________________

३.मी सकाळी लवकर उठायचे ठरवतो परंतु ______________________________

______________________________________________

४.कोव्हिडने आजारी पडू नये म्हणून ______________________________

______________________________________________

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.

© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न ५अ) खाली  दिलेले चित्र पाहा व पाच ते सहा वाक्यात वृत्तपत्र बातमी लिहा.   गुण ५



गुरुवार, १ जुलै २०२१ मुंबई, भारत

-----------------------------------------------



Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.
© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

प्रश्न ५ब) खालील चित्राचे ५ ते ६ वाक्यात वर्णन करा. गुण ५



___

___

___

___

___

___

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.
© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ६) खाली दिलेले शब्दगट वापरून त्या संदर्भात (context) प्रत्येकी दोन वाक्ये बनवा. गुण१०**

उदाहरण – भारत, श्रीलंका: भारताच्या दक्षिणेला श्रीलंका हा देश आहे. श्रीलंकेची राजधानी कोलंबो आहे.

१.मकर संक्रांत, हळदीकुंकू-

२. कृष्ण, दहीहंडी-

३.प्रवास, आगगाडी-

४. भारत देश, पोषाख-

५. महाराष्ट्र, सावरकर-


© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ७ अ) खालील शब्दाचे लिंग चूक की बरोबर ते लिहा. गुण२.५**

| | |
|---|---|
| नदी – स्त्रीलिंगी | ग्रह – नपुंसकलिंगी |
| पठार – स्त्रीलिंगी | हळद – पुल्लिंगी |
| दुष्काळ – पुल्लिंगी | श्लोक – पुल्लिंगी |

**प्रश्न ७ ब) खाली दिलेल्या <u>शब्दसमुहात न बसणारा</u> शब्द बाजूला लिहा. गुण २.५**

| | | | |
|---|---|---|---|
| उदाहरण --- | गोड पदार्थ | गुलाबजाम, श्रीखंड, खीर, पावभाजी | पावभाजी |
| | | | |
| १ | भारत | कोल्हापूर, सिंगापूर, नागपूर,जयपूर | |
| २ | अवकाश | उल्का, धुमकेतू, लघुग्रह, गहू | |
| ३ | वाहने | बैलगाडी, होडी, सळई , रिक्षा | |
| ४ | वीर सावरकर | अंदमान,लंडन, नाशिक,न्यूयॉर्क | |
| ५ | गोष्ट | कवायत, कथा, किस्सा, कहाणी | |

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.
© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ७ क) खालील वाक्ये वाचून कंसातील योग्य वचनाभोवती गोल ( ) करा. गुण२.५**

१. हवाई येथील समुद्र ___________ लोकप्रिय आहेत.( किनारे/ किनाऱ्या )

२.गीरच्या जंगलात अनेक ___________ राहतात.( प्राणे / प्राणी )

३.मला मराठी ___________ येते. ( भाषे / भाषा )

४.सकाळ, दुपार, संध्याकाळ हे दिवसाचे ___________ आहेत.
( भागा / भाग )

५. अरबी समुद्राच्या पूर्वेस भारत हे ___________ आहे. ( राष्ट्र / राष्ट्रे)

**प्रश्न ७ ड) खालील वाक्यांतील क्रियाविशेषणांभोवती गोल करा . गुण२.५**

उदाहरण: मी दादाच्या घरी (लवकर) पोहोचेन.

१.अनिकाचा पियानोचा क्लास अनेकदा बुडतो.

२.अर्जुनला भूक लागली म्हणून तो जोरात रडला.

३.विजयने सॉस भसकन् ओतला.

४.फोन सारखा वाजत होता.

५. कोणता सिनेमा बघायचा हे लगेच ठरले.

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.
© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**प्रश्न ८अ) खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.** **गुण ५**

Everyone needs sleep. Our brain has an invisible clock. When it gets dark, this clock sends a message to the brain. Then we feel sleepy. When we are asleep, our brain is still working.

**प्रश्न ८ ब) खालील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा.** **गुण ५**

लता मंगेशकर ही जगप्रसिद्ध गायिका होती. तिच्या वडिलांचे नाव दीनानाथ. वयाच्या पाचव्या वर्षापासून तिने गायला सुरूवात केली. लताने छत्तीसपेक्षा अधिक भाषांतून गाणी गायली आहेत. तिने गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली कारण तिचा आवाज खूपच गोड होता.

Produced by BMM Marathi Shala Exam Committee. Material used by BMM Marathi Shala only.
© Copyright. BMM Shala Exam Committee
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.